# ई-निविदा पेपर

**भाड्याने वाहने पुरविणे सन २०२१ ते २०२२**

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा)
राजभवन आवार, बाणेर रोड,
पुणे ४११ ००७.
**टेलिफोन नंबर: - २५६०८२३० / ८२३८**

# यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा)

## ई-निविदा सूचना २०२१-२०२२

दुरध्वनी क्रमांक:- ०२०-२५६०८२३८/२३०

यशदा करिता सन २०२१-२०२२ या एक वर्ष कालावधीसाठी आवश्यतेनुसार भाडयाने वाहन पुरविणे या करिता मा. महासंचालक,यशदा यांच्या वतीने तत्सम कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून दर करार करण्याकरिता दिनांक १५/०९/२०२१ ते दिनांक २३/०९/२०२१ या कालावधीमध्ये ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

सदरील कामाचा सन २०२१-२०२२ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजित खर्च रुपये २०,००,०००/- (रूपये वीस लाख फक्त) इतका आहे. यासाठी बयाणा रक्कम रुपये ५०,०००/- (रूपये पन्नास हजार फक्त) इतकी असून निविदा फॉर्म फी रुपये ३,०००/- (रुपये तीन हजार फक्त) इतकी आहे. सदर ई-निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे. निविदादारांना ई-निविदा भरण्यासाठी ई-निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १५/०९/२०२१ रोजी सकाळी ०९.३० पासून उपलब्ध होतील. वरील कामांची ई-निविदा सूचना निविदादारांच्या माहितीसाठी www.yashada.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर ई-निविदा भरण्याची अंतिम तारीख २३/०९/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत असेल. निविदादारांच्या शंका समाधानासाठी दिनांक १७/०९/२०२१ रोजी दुपारी ०३.०० वाजता प्री-बीड मिटींग आयोजित करण्यात येत आहे, निविदादारांनी त्यास उपस्थित रहावे.

सदरील निविदेची किंमत व बयाना रक्कम https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे, याची सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी. ई-निविदा बाबत काही शंका असल्यास वरील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच तांत्रिक मदतीसाठी एनआयसी च्या १८००३०७०२२३२ टोल फ्री नंबरवर अथवा यशदातील ८००७१८६०७१ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# ई-निविदा सूचना

## भाडे तत्वावरील वाहन व्यवस्था-२०२१-२०२२

| | |
|---|---|
| अंदाजे उलाढाल रक्कम | - रूपये २०.०० लाख (एक वर्षासाठी) |
| सुरक्षा ठेव | - ३% (**of Estimated cost)** |
| बयाणा रक्कम ठेव | - रुपये ५०,०००/- |
| ई-निविदा फॉर्मची किंमत | - रुपये ३०००/- (ना परतावा रक्कम) |
| ई-निविदा फॉर्म भरण्याचा कालावधी | - दिनांक १५/०९/२०२१ ते दि.२३/०९/२०२१ |
| ई-निविदा फॉर्म भरण्याची अंतिम तारीख व वेळ | - दिनांक २३/०९/२०२१ दुपारी ३.०० वाजता |
| ई-निविदेसाठीची प्री-बीड मिटींग | - दिनांक १७/०९/२०२१ दुपारी ०३:०० वाजता |
| ई-निविदेतील तांत्रिक लिफाफे उघडण्याची तारीख व वेळ | - दिनांक २४/०९/२०२१ दुपारी ०३.०० वाजता |

# यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा)

यशदा मध्ये २०२१ ते २०२२ या कालावधी करिता दर कराराने वाहन व्यवस्था पुरवण्या करिता ई निविदा पध्दतीने मा. महासंचालक, यशदा यांच्या वतीने तत्सम कामाचा अनुभव असलेल्या ठेकेदारांकडून ई-निविदा मागवण्यात येत आहे.

०२ यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) ही महाराष्ट्र शासनाच्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणारी भारतातील एक अग्रगण्य स्वायत्त संस्था आहे.

०३. यशदामध्ये वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. सदर प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये क्षेत्र भेटी, अभ्यास सहली ही आयोजित केल्या जातात. येथे येणारे अधिकारी हे महाराष्ट्र व केंद्र शासनाचे उच्च पदावरील अधिकारी असल्याने त्यांच्यासाठी वेळोवेळी सुसज्ज व सुस्थितीत असलेल्या वाहनांची आवश्यकता भासते.

०४. Indigo/ Dzire/Xcent/Zest/Etios/Ford Aspire/ Honda Amaz/ /Tavera/Lodgy/Ertiga/Xylo/ Innova/ Innova Crysta इत्यादी गाडयांचे एसी तसेच १७ आसनी, ३२ आसनी व ४९ आसनी, तसेच Volvo इत्यादी गाडीचे एसी व बिगर एसी वाहनांचे दरपत्रक सोबतच्या विहीत नमून्यामध्ये भरावेत.

# लिफाफा क्रमांक १ (तांत्रिक लिफाफा)

**(Techinical Bid)**

## वाहन व्यवस्था पुरविणाऱ्या संस्थेने पुढील प्रमाणे कागदपत्रे सादर करावीत,

१. शासकीय, निमशासकीय, खाजगी संस्था यांचे कडे समाधानकारकपणे वाहने पुरविले/ पुरवत असल्याचे किमान तीन वर्षाचे अनुभव प्रमाणपत्र (पुरावे-करारनामा/आदेश) सन २०१७ पुढील

२. एजन्सी / कंपनीची माहिती/वाहतूकदार संस्था नोंदणीप्रमाणपत्र आवश्यक

३. - मालकाचे नांव
- कार्यालयाचा संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमाक, फॅक्स नंबर, ई-मेल पत्ता.

४. वस्तू व सेवा कर (GST) प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

५. पॅन कार्ड छायांकित प्रत.

६. आपण सेवा पुरवठा करत असलेल्या ग्राहकांची यादी व त्या कार्यालयाचे पत्ते, व दूरध्वनी क्रमांक.

७. स्वत:च्या मालकीच्या वेगवेगळया प्रकारच्या किमान ०३ कार व ०१ बस असणे आवश्यक. पुरावा म्हणून वाहननोंदणी प्रमाणपत्रांच्या प्रती जोडाव्यात.(**टॅक्स पावतीसह**) ०१ बस स्वत:ची नसल्यास इतर संस्थेकडून बस पुरविण्याबाबतचे हमी पत्र जोडणे आवश्यक राहील.

८. वर अ. क्र. ०७ येथे नमूद केलेल्या स्वत:च्या मालकीच्या वाहनांखेरीज दुस-या संस्थेची वाहने पुरविणार असल्यास संबंधित संस्थेचे संमतीपत्र असले पाहिजे. पुरावा म्हणून संमतीपत्र जोडणे आवश्यक राहील. सर्व वाहने स्वत:ची असल्यास निविदादांराने तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.

९. मागील तीन वर्षाची (सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२०) वाहने भाडयाने पुरविण्याबाबतची उलाढाल किमान रूपये १० लाख प्रतिवर्ष असल्याबद्दलचे सी. ए. चे लेटरहेडवरील प्रमाणपत्र. Profit & loss A/c व Balance Sheet च्या प्रती जोडू नयेत.

१०. ई निविदा फॉर्मची किंमत व बयाणा रक्कम ठेव भरणा केल्याबाबतचा पुरावा म्हणून ई चलनाची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

**वरील अ. क्र. ०१ ते ०९ येथील सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे आवश्यक असून त्यांची पूर्तता न झाल्यास लिफाफा क्र. २ (Financial Bid) उघडला जाणार नाही.**

## लिफाफा क्रमांक २ (Financial Bid)

यामध्ये फक्त **परिशिष्ट - 'अ'** येथे विहीत नमुन्यामध्ये निविदेच्या दराबाबत माहिती सादर करावी.

**निविदेच्या परिशिष्ट अ मधील सर्व वाहनांच्या दराचे सर्व रकाने भरणे अनिवार्य आहे**

अ) लिफाफा क्र.१ उघडल्यानंतर आवश्यक दस्तऐवजांची पूर्तता केली असल्याची खात्री केल्यानंतरच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

ब) लिफाफा क्र. २ उघडण्याच्या तारखेपासून निविदा स्विकृत करण्याचा कालावधी चार महिने राहील.

# ई-निविदाबाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

०१. ई-निविदा दोन लिफाफे पध्दतीने ऑनलाईन (online) सादर करणे आवश्यक आहे.

०२. विहीत वेळेत प्राप्त निविदा उपस्थित निविदाधारकांसमोर तसेच यशदातील प्राधिकृत अधिकारी यांचे समोर उघडण्यात येतील.

०३. सर्व प्रथम लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल व निविदेत नमूद केल्यानुसार आवश्यक ती कागदपत्रे/प्रमाणपत्रे सादर केले आहेत याबाबत खात्री करून घेतल्यानंतरच निविदेतील दराबाबतचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

०४. आवश्यक कागदपत्रे/ प्रमाणपत्रे व निविदा दर सादर केल्याचे आढळून न आल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल. सादर केलेली कागदपत्रे / प्रमाणपत्रे चुकीची किंवा खोटी आढळल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

**०५.**

**अ. दराचा लिफाफा उघडल्यानंतर ज्या निविदादारांचे दर ज्या बाबीसाठी न्यूनतम आहेत त्या त्या बाबीचा ठेका त्या त्या बाबीसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदा दाराकडे सोपविण्यात येईल.**

**ब. निविदादाराने न्यूनतम दराने सेवा देण्यास असमर्थता दर्शविल्यास संबंधीत निविदादाराची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व सदर निविदादारास संस्थेच्या काळया यादीमध्ये समाविष्ट करण्याचे अधिकार मा. महासंचालक यशदा यांच्याकडे राहतील.**

०६. यशदाकडून मान्य करण्यात आलेला दर यशदातील सर्व विभागांसाठी व कार्यालयांसाठी लागू राहतील.

०७. मान्य झालेल्या दरानुसार व यशदाच्या मागणीनुसार वाहनांचा वर्ष २०२१-२२ या एक वर्षासाठी पुरवठा करणे आपणावर बंधनकारक असेल. कराराचा कालावधी दर करार झाल्यापासून एक वर्षाचा राहील.

०८. सदर कामाचा ठेका मंजूर झाल्यास त्याबाबतच्या कराराचा मसुदा यशदामधून घेऊन तो शासन नियमानुसार आवश्यक रकमेच्या शासकीय मुद्रांक पेपरवर तयार करून द्यावा लागेल. मुद्रांक पेपरचा तसेच निविदेचा खर्च ठेकेदारास करावा लागेल.

०९. अंदाजित उलाढालीच्या ३% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून (बिनव्याजी) ठेकेदाराने यशदाकडे भरणा करणे आवश्यक आहे. कराराची मुदत संपल्यानंतर सदर रक्कम ठेकेदारास परत करण्यात येईल.

१०. ठेकेदारास कार्यालयाकडून वाहनाची वर्दी (बसेस साठी किमान ०२ दिवस आधी व इतर वाहनांसाठी किमान ०२ तास अगोदर) देण्यात येईल.

११. वाहनासाठी वर्दी मिळाल्यानंतर वाहन विहीत वेळेत विहीत पत्त्यावर पोहोचणे आवश्यक आहे.

१२. निविदाधारकाने निविदा मंजूर होवून करारनामा केल्यांनतर पुरविण्यात येणारी सर्व वाहने १ जानेवारी २०१८ च्या नंतरच्या मेकचे असलेली पुरवठा करणे बंधनकारक राहील. तसेच वाहने प्रत्यक्ष भाड्याने लावणेपूर्वी प्रत्येक वाहनाच्या सुस्थितीबाबत तपासणी, आसन क्षमता, वाहनांची आर.सी./टी.सी, वाहन इन्श्युरन्स, वाहन परमीट, पी.यु.सी., फिटनेस सर्टिफिकेट, वाहनचालकाचे परवाना वैधता इत्यादी बाबींची तपासणी संबंधित कंत्राटदाराने करावयाची आहे. तसेच वाहनामध्ये GPS Tracking सुविधा असणे आवश्यक आहे. देयकासोबत GPS Tracking Report जोडणे आवश्यक आहे.

१३. ठेकेदाराकडून पुरविण्यात आलेल्या वाहनात दोष आढळून आल्यास किंवा वाहन विहीत कालावधीत उपलब्ध न झाल्यास, वाहन चालकाचे गैरवर्तन आढळून आल्यास त्या वर्दीच्या देयकातून ३०% रक्कम दंड म्हणून कपात करण्यात येईल. याबाबत यशदा कडुन कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१४. प्रवास करते वेळी लागणाऱ्या वाहनांच्या व चालकांच्या सर्व कायदेशीर कागदपत्रांची ठेकेदारामार्फत पूर्तता केलेली असावी उदाहरणार्थ वाहनातील प्रवाशांसह वाहन विमा इ. प्रवासादरम्यान काही कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास ठेकेदार त्यास पूर्णपणे जबाबदार राहील.

१५. प्रवासादरम्यान अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१६. वाहनावर पाठविण्यात आलेला वाहनचालक आज्ञाधारक व चांगल्या वर्तणुकीचा, प्रामाणिक व स्वच्छ गणवेशात असावा. बाहेर गावी वाहन पाठवताना संबंधित वाहनाच्या वाहनचालकाने किमान ०८ तास अगोदर इतर कोणतीही वर्दी केलेली नसावी.

१७. निविदा दारांनी दर भरताना वस्तू व सेवा कर वगळून भरावेत सदर कराची रक्कम त्यांना संस्थे मार्फत अदा करण्यात येईल व आवश्यतेनुसार शासन नियमा प्रमाणे आवश्यकत्या वजाती करण्यात येतील निविदादारनी भरलेले दर निविदा कालावधी पर्यत लागू राहतील. यशदा मार्फत आवश्यकतेनुरूप सेवा कालावधीस मुदतवाढ देण्यात येईल.

१८. ठेकेदाराने टोल/fastag , पार्किग, परमीट व इतर राज्यांचे कर यांची प्रतिपूर्ती प्रत्यक्षात आकारल्यानुसार देयकाव्दारे यशदास सादर करावी ती यशदाकडून अदा करण्यात येईल. वाहन पुरविताना आवश्यक तेवढे इंधन / टोल/fastag/पार्किग यासाठी लागणारी रक्कम संबंधित वाहन चालकाकडे असल्याची खात्री करुनच वाहन पुरविण्यात यावे.

१९. वाहनाची वेळ व किलोमीटर याची गणना यशदा संस्थेच्या कार्यालयापासून परत यशदा कार्यालयापर्यंत अशी करण्यात येईल.

२०. वाहन यशदामध्ये येण्यापुर्वी वाहन तयारीसाठी कोणताही जादा कालावधी (१/२ तास,१ तास ) अनुज्ञेय असणार नाही. प्रत्यक्षात वाहन यशदात आल्याची वेळ व प्रवासानंतर वाहन परत यशदात आल्याची वेळच परिगणनेसाठी ग्राहय धरण्यात येईल.

२१. वाहनाचा एक पूर्ण दिवस रात्री १२.०० वाजता संपेल, परंतू रात्री १२.०० ते पहाटे ३.०० या वेळेत वाहनाचा प्रवास संपल्यास त्यास दुसरा दिवस लागू होणार नाही. रात्री १२.०० ते ३.०० या कलावधीच्या प्रवासाचे भाडे परिशिंष्ट अ मधील नमूद केल्याप्रामणे प्रतितासाने अदा करण्यात येईल. पहाटे ३.०० नंतर दुसरा दिवस सूरु होईल. हीच पध्दत पुढील प्रत्येक दिवसासाठी असेल. वाहनात काही तांत्रिक दोष निर्माण झाल्यास तेवढा कालावधी एकूण कालावधीतून वजा केला जाईल.

२२. निविदे सोबत जोडलेल्या लिफाफा ०२ मधील **परिशिष्ट 'अ'** (दराबाबतचा लिफाफा) मध्ये नमूद केलेली वाहने उपलब्ध करुन देण्याबाबतचा तपशीलासमोर प्रत्येक बाबीसाठी दर नमूद करणे बंधनकारक राहील.

२३. वाहन पुरवठादाराच्या सेवेत व्यत्यय आल्यास यशदा मार्फत इतर वाहन पुरवठादारांकडून मिळेल त्या दराने तत्सम सेवा उपलब्ध करुन घेण्यात येईल व त्यापोटी होणा-या अतिरिक्त खर्चाच्या वसुलीस वाहनपुरवठादार पात्र राहील.

२४. वाहनांची देयके ठेकेदाराने साठवून एकाच वेळी देण्यापेक्षा वेळोवेळी सादर करावीत, डयूटी स्लीप/देयके अर्धवट किंवा खाडाखोड असणे त्याच बरोबर डयुटी स्लीपवर वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी, नाव व अचूक कि. मी. नमूद नसलेल्या देयकांची रक्कम अदा करण्यात येणार नाही. तसेच डयुटी स्लीपवर वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनामासह तसेच यशदा मध्ये वाहन दाखल झाल्याची दिनांकासह वेळ व सुरूवातीचे कि.मी. तसेच प्रवासाहून वाहन परतल्यानंतर यशदा मध्ये दाखल झाल्याची दिनांकासह वेळ व शेवटचे कि.मी. व इतर नोंदी घेऊन संबंधित वाहन वापरणाऱ्या अधिकाऱ्याची डयुटी स्लीपवर नावासह स्वाक्षरी घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची असेल. तसेच आवश्यकतेनुसार वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२५. वाहनाची वर्दी दिल्यानंतर वर्दीच्या वेळेपूर्वी दोन तास अगोदर वर्दी रद्द करण्याची सूचना केल्यानंतर सदर वाहनाची वर्दी रद्द समजण्यात यावी आणि ज्या प्रकारच्या वाहनाची मागणी केली आहे त्याच प्रकारचे वाहन पुरविणे बंधनकारक राहील.

**२६. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक: भांखस-**२०१४/ **प्र. क्र. ८२/ भाग-**III/ **उद्योग-४ दिनांक-** ०१ **डिसेंबर, २०१६, ६.८ मधील परिशिष्ट - ८ नुसार सुक्ष्म व लघू, मध्यम उद्योग विकास अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघू उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.**

**२७. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक: भांखस-**२०१४/ **प्र. क्र. ८२/ भाग-**III/ **उद्योग-४ दिनांक-** ०१ **डिसेंबर, २०१६, मधील परिशिष्ट - ८ नुसार निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.**

२८. करार कालावधीमध्ये कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास संस्थेमार्फत ठेका रद्द करण्याची ३० दिवसांची नोटीस देण्यात येईल, त्याच प्रमाणे कंत्राटदारामार्फत ठेका रद्द करावयाचा झाल्यास करार सुरु झाल्यापासून ०६ महिणेनंतर कंत्राटदाराने संस्थेला ९० दिवसांची आगाऊ नोटीस देणे बंधनकारक राहील. यासाठी कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार नाही.

२९. या व्यतिरिक्त ठेकेदारांच्या कोणत्याही अटी व शर्ती मंजूर करण्यात येणार नाहीत.

३०. यशदाच्या गरजेनुसार करारास मुदतवाढ देणे अथवा न देणे यांचे संपूर्ण अधिकार मा. महासंचालक यशदा यांचे राहतील. मुदतवाढ देण्यात आल्यास त्यानुसार वाहने पुरविण्याची ठेकेदाराची जबाबदारी राहील.
३१. सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास मा. महासंचालक यशदा यांचे निर्णय अंतिम राहतील.

३२. या करारास पुणे शहारापुरतेच न्यायाधिकार कक्ष (लीगल ज्यूरिस्डिक्शन) मर्यादित राहील.

३३. एक अथवा सर्व ई-निविदा अंशत: अथवा पुर्णता स्विकारणे अथवा नाकारणे किंवा अंशत: अथवा पुर्णता कोणत्याही कारणा शिवाय रद्द करण्याचे अधिकार मा. महासंचालक यशदा यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

३४. सदर ई-निविदेच मुल्य सध्याची आपदाजनक स्थिती लक्षात घेवून मागील एक वर्षातील वस्तू / सेवांची प्रत्यक्ष मागणी विचारात घेवून ठरविण्यात आले आहे. तथापि भविष्यातील आपदाजनक स्थितीच्या तिव्रतेनुसार वस्तू / सेवांची मागणी ही आपदापुर्व स्थितीप्रत जावु शकते. हे लक्षात घेता सेवा पुरवठादारास निविदामुल्यांच्या १००% च्या प्रमाणात अतिरिक्त वस्तू / सेवांचा पुरवठा आहे त्याच दराने आहे त्याच अटी व शर्तीतुसार निविदा कालावधीसाठी तसेच सदर ई-निविदेच्या करारास मुदतवाढ दिली गेली असल्यास सदरच्या मुदतवाढ कालावधीसाठीसुध्दा पुरवठा करणे बंधनकारक असेल. तसेच काही कारणास्तव संस्थेच्या सेवा मागणीमध्ये निविदामुल्यापेक्षा अधिकची वाढ झाल्यास अतिरिक्त निविदा मुल्यानूसार अनुज्ञेय होणारी सुरक्षा ठेव रक्कम पुरवठादाराच्या देयकातुन वळती करण्या येईल.

३५. वाहनचालकांचा गणवेश स्वच्छ असणे आवश्यक आहे. तसेच वाहन चालकाने संपूर्ण प्रवासामध्ये मास्क आणि ग्लोव्ह्ज परिधान करणे आवश्यक आहे.

३६. वर्दी चालू होण्याअधी व वर्दी संपल्यानंतर वाहन स्वच्छ करणे आवश्यक आहे. वाहन आतील व बाहेरील बाजूनी सॅनिटायझरने स्वचछ करणे आवश्यक आहे.

३७. कोव्हीड-१९ गाईडलाइन तसेच शासनाच्या कोव्हीड-१९ च्या प्रार्दभावाच्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमीत झालेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

## परिशिष्ट अ

## लिफाफा क्रमांक ०२ (दराबाबतचा लिफाफा)

| अ.क्र. | एजन्सीचे नाव | वाहनाचा प्रकार | यशदा ते पुणे शहारातील बस / रेल्वे स्थानक सोडणे / आणने दर (वस्तू व सेवा कर वगळून) | यशदा ते पुणे शहारातील विमानतळ सोडणे / आणने दर (रु.) (वस्तू व सेवा कर वगळून) | स्थानिक वाहतूक | | | बाहेरगावी वाहतूक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ८ तास ८० कि.मी दर (रू.) (वस्तू व सेवा कर वगळून) | पुढील जादा प्रति कि.मी दर (रु.) (वस्तू व सेवा कर वगळून) | प्रतिक्षा दर प्रति तास (रु.) (वस्तू व सेवा कर वगळून) | प्रतिदिवशी किमान वापर व दर प्रति ३०० कि.मी (रु.) (वस्तू व सेवा कर वगळून) | पुढील जादा प्रति कि.मी. दर (रु.) (वस्तू व सेवा कर वगळून) | प्रतिक्षा दर प्रति तास (रु.) (वस्तू व सेवा कर वगळून) |
| १ | | **Indigo/Dezier/Xcent/ Zest/Etios/ Ford Aspire/ Honda Amaz (A/C)** | | | | | | | | |
| २ | | **Tavera/Lodgy/Ertiga/Xylo AC** | | | | | | | | |
| ३ | | **Innova AC** | | | | | | | | |
| ४ | | **Innova Crysta AC** | | | | | | | | |
| ५ | | **17 Seater AC** | | | | | | | | |
| ६ | | **17 Seater Non AC** | | | | | | | | |
| ७ | | **32 Seater AC** | | | | | | | | |
| ८ | | **32 Seater Non AC** | | | | | | | | |
| ९ | | **49 Seater AC** | | | | | | | | |
| १० | | **49 Seater non AC** | | | | | | | | |
| ११ | | **Volvo Bus AC** | | | | | | | | |
| १२ | | **Tempo Pickup/Tempo Mini Truck** | | | | | | | | |
| १३ | | **Tempo 407/709** | | | | | | | | |

**निविदा सादर करण्याऱ्या संस्थेचे नाव प्राधिकृत प्रतिनिधीची स्वाक्षरी व संस्थेच्यारबरी शिक्क्याचा ठसा**